**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : १०७०/२०२२**

**तक्रारकर्ता,** श्री.किशोर विजय म्हात्रे,
जसखार, जे.एन.पी.टी.,
ता.उरण, जि.रायगड ४०० ७०७.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय जसखार, ता.उरण,
जि.रायगड ४०० ७०७

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय जसखार, ता.उरण,
जि.रायगड ४०० ७०७

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १९/११/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ४/३/२०२२ | ---- | १८/४/२०२२ | ९/५/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२०/७/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही" असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १९/११/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र सातंगे, ग्रामंपचायत अधिकारी, ग्रामपंचायत जसखार उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" *मी जसखार गावातील रहिवासी असून मला जसखार ग्रामपंचायत मध्ये पब्लिक हेल्थच्या नावाने खर्च केलेल्या रकमेची सविस्तर माहिती मिळावी. १.सन २०१८ पासून २०२२ आज तारखेपर्यंत ग्रामपंचायतमध्ये सॅनिटरी नॅपकिन खरेदी केलयाची बिलांची प्रत मिळावी. २.सन २०१८ पासनू २०२२ आज तारखेपर्यंत ग्रामपंचायत मधून देण्यात आलेल्या सॅनिटरी नॅपकिनच्या लाभार्थ्यांची नावे मिळावी. ३. सन २०१८ पासून २०२२ आज तारखेपर्यंत ग्रामपंचायतमधून टीसीएल पावडर, कारबोलीक पावडर व क्लोरिवाईत खरेदी केलेल्या बिलांची प्रत मिळावी. ४.सन २०१८ पासून २०२२ आज तारखेपर्यंत ग्रामपंचायत मधून डस्टबिन खरेदी केलेल्या बिलांची प्रत मिळावी.* "

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.९/५/२०२२ रोजी, "*जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र सातंगे ग्रामसेवक यांनी या आदेशाच्या तारखेपासुन दि.१७/५/२०२२ या तारखेपर्यंत अपीलकार यांना माहिती पुरवावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, त्यांनी दि.६/१०/२०२५ रोजी माहिती दिली आहे. तसेच तक्रारकर्ता यांनी त्यांना माहिती प्राप्त झाली असून ते समाधानी आहेत तक्रार निकाली काढावी अशी दि.८/१०/२०२५ रोजीच्या पत्राव्दारे आयोगास विनंती केली.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

तक्रारकर्ता यांना माहिती प्राप्त झाल्याने त्यांच्या विनंतीवरून तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १९ नोव्हेंबर, २०२५ .

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

Comp-३